**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी**
**कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट (पुरुष) स्पर्धेचे आयोजन ०६ ते १३ जानेवारी दरम्यान**
**उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.श्री विनोद तावडे यांचे शुभहस्ते विद्यापीठातील क्रिकेट मैदानाचे उद्‌घाटन**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट (पुरुष) स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्रातील सोळा विद्यापीठांतील कर्मचाऱ्यांसाठी दि. ०६ ते १३ जानेवारी, २०१९ दरम्यान विद्यापीठ क्रीडा संकुलावर निर्माण केलेल्या सुसज्ज क्रिकेट मैदानावर करण्यात आले आहे. सुसज्ज व भव्य-दिव्य क्रिकेट मैदान विद्यापीठात तयार करण्यात आले असून या मैदानाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.श्री विनोद तावडे यांचे शुभहस्ते दि. ०४ जानेवारी, २०१९ रोजी होणार आहे.

दि. ०६ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ क्रीडा संकुल क्रिकेट मैदानावर आयोजित क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली, अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री प्रवीण पोटे (पाटील) यांचे शुभहस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री ह.व्या.प्र. मंडळ, अमरावतीचे महासचिव पद्‌मश्री प्रभाकररावजी वैद्य उपस्थित राहणार असून प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

दि. १३ जानेवारी, २०१९ रोजी दु. १.०० वाजता समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम होणार असून त्याचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषवतील. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी भारतीय क्रिकेटर तथा विदर्भ क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री प्रशांत वैद्य उपस्थित राहणार असून प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

०६ ते १३ जानेवारी दरम्यान विद्यापीठ क्रीडा संकुलातील क्रिकेट मैदानावर आयोजित क्रिकेट सामन्यांचा आनंद सर्वांना घेता येणार आहे. तरी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०१/०१/२०१९.
दै............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी